: प्रकरण सहावे :

# उपसंहार

# उपसंहार

प्रस्तुत प्रबंधिकेत उद्धव ज. शेळके यांच्या एकूण तीन कथासंग्राहाचा अभ्यास केला आहे. 'शिळान अधिक आठ कथा', 'वानगी' आणि 'कडूनिंबाची सावली' या तीन कथासंग्राहाच्या आधारे एकूण सहा प्रकरणात हा अभ्यास केला आहे. प्रबंधिकेच्या पहिल्या प्रकरणात "मराठी ग्रामीण कथेची वाटचाल" यामध्ये मराठी ग्रामीण कथेचे थोडक्यात स्वरूप याविषयी चर्चा करून मराठी ग्रामीण कथेचा उदय व विकासातील टप्पे याचा आढावा घेतला आहे.

१८९७ च्या दुष्काळाचे चित्रण करणारी 'काळ तर मोठा कठीण आला' ही हरिभाऊंची गोष्ट ग्रामीण कथेची सुरूवात मानली जाते. मात्र श्री.म.माटे यांच्याकडे ग्रामीण कथेचे जनकत्व जाते. म.गांधीजींची चळवळ, शिक्षणाचा प्रसार, स्वातंत्र्योत्तर काळात भारताने स्वीकारलेली लोकशाही जीवनपद्धती, औद्योगिककरण आणि दळणवळणाने ग्रामीण जीवनात झालेली जागृती या सारख्या सामाजिक आणि सांस्कृतिक बदलाने हे ग्रामीण साहित्य निर्माण झाले आहे. या साहित्याने ख-या अर्थाने महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविण्यास प्रारंभ केला. कृषिनिष्ठा निसर्ग सन्मुखता, गावगाडयाचे चित्रण, ग्रामीण कुटुंब-व्यवस्था आणि नातेसंबंध, आदिमतेकडे कल, ग्रामीण लोकसंस्कृतीचे दर्शन, ग्रामीण बोली भाषेतून अविष्कार ही मराठी ग्रामीण साहित्याची प्रमुख वैशिष्टये होत.

"समाजातील सगळेजण एकमेकाशी बांधलेली आहेत. आपण या समाजाचा घटक आहोत अशी जाणीव व्यक्तिंच्या ठायी निर्माण झाली म्हणजे जीवनाचा अनुभव स्वयंकेंद्रितपणे न घेता समाजशीलवृत्तीने मानण्याचा व्यापक भूमिकेवरून घेतात अश्याप्रकारे अनुभव घेण्याची क्षमता व धाटणी म्हणजे ग्रामीण संवेदनशीलता होय.

१९४५ च्या सुमारास मराठी कथेमध्ये महत्वपूर्ण परिवर्तन घडले. व नवकथा उदयाला आली. ग्रामीण कथेतही मूल्यात्मक फरक झाला. ग्रामीण कथेला आशयाच्या अभिव्यक्तीच्या अंगाने समृद्ध करण्याचे काम व्यंकटेश माडगूळकरांनी केले. माडगूळकरांच्या कथेने ग्रामीण कथेला नवकथेच्या शेजारी आणून बसविले. माडगूळकरांनी मराठी ग्रामीण कथेचे आद्य व अभिजात पीठ स्थापन केले. हरिभाऊ आपटे यांच्या पासून व्यंकटेश माडगूळकर यांच्या पर्यंत ग्रामीण कथेत कसा फरक पडत गेला या विषयाची चर्चा केली आहे. माडगूळकरानंतर ज्या महत्वाच्या ग्रामीण कथाकारानी भर घातली याचाही आढावा घेतला आहे.

१९६० सालापासून नव्या नव्या विकास योजना खेडयापाडयात राबवल्या जाऊ लागल्या. कारखाने निघाले शिक्षणाचा प्रसार झाला. एक नवी पिढी नव्या जाणीवाने लिहू लागली. या पिढीतील महत्वाचे ग्रामीण कथाकार आनंद यावद, रा.रं.बोराडे, महादेव मोरे, चंद्रकुमार नलगे, सखा कलाल, चारूता सागर, उद्धव ज. शेळके यांच्या कथेविषयी थोडक्यात विवेचन प्रस्तुत प्रबंधिकेत केले आहे.

मराठी ग्रामीण कथेत माडगूळकर, पाटील, मिरासदार यांचा प्रभाव मोठया प्रमाणात दिसतो. या तीन कथाकाराबरोबर चौथे आणि महत्त्वाचे कथाकार म्हणजे विदर्भातले उद्धव ज. शेळके हे होय. कोणत्याही विशिष्ट विचारसरणीचा चष्मा न घालता शेळके यांनी उपेक्षित, पीडित व दरिद्री माणसाच्या व्यथाना वाणी दिली. त्यानी आपल्या कथांमधून विदर्भातील परिसराचे सामाजिकदृष्टया सखोल असे चित्रण केलेले दिसून येते.

अशा प्रकारे निरनिराळया प्रदेशातील कथाकारानी हा प्रावह समृद्ध केला आहे. ग्रामीण समाजाला वाचकासमोर ठेवले. रा.रं.बोराडे, आनंद यादव, उद्धव ज.शेळके सखा कलाल, चारूता सागर यानी निष्ठेने हा प्रवाह वाहता ठेवलेला आहे. ग्रामीण बोलीतूनच

कथा स्वाभाविक अंगाने प्रकट झाली. केवळ रूचीपालटण्यापेक्षा जीवन दर्शन महत्वाचे ठरले. म.द.अदवंताने म्हटले आहे की, त्यांच्या कथेमधून आलेला आशय जिवंत व प्रत्ययकारी वाटू लागला. त्यांची अभिव्यक्ती ग्रामीण भाषेतून होऊ लागली. त्यामुळे ग्रामीणस कथातून बोली भाषेची विविध रूपे प्रकट होऊ लागली. भाषा समृद्ध करण्याचे फार मोठे कार्य या ग्रामीण कथानी केले. मराठी ग्रामीण कथेचा विकास होत गेला. त्यामुळे मराठी ग्रामीण कथेमध्ये सातत्य टिकून राहिले.

दुस-या प्रकरणात 'शिळान अधिक आठ कथा' या कथासंग्रहातील कथेची स्वरूप व वैशिष्टये सविस्तरपणे सांगितली आहेत. या प्रकरणाच्या प्रारंभी प्रास्ताविकेमध्ये शेळके यांचा परिचय करून दिला आहे. त्यानंतर साहित्याची प्रेरणा त्यांची एकूण साहित्यसंपदा या गोष्टीचा सविस्तर विचार केला आहे.

'शिळान अधिक आठ कथा' या कथासंग्रहाची स्वरूप व वैशिष्टये सांगून प्रत्येक कथेचा आशय स्पष्ट केला आहे. आवश्यक त्या कथांचे कथानक सांगून प्रत्येक कथेतील स्त्रीजीवन व त्यांच्या व्यथा, वेदना, समस्या या अनुषंगाने आढावा घेतला आहे. स्त्री जीवनाचे दुःख प्रकर्षाने जाणवते. शेळक्यांच्या प्रत्येक कथेतील व्यक्तीना स्वतःच्या मर्यादेचे भान आहे. हे भानच त्याना जीवनातील व्यथा, वेदना, सोसण्यासाठी सामर्थ्य देते. सर्व सामान्य स्त्री सोशिक आहे. शेळक्यांच्या कथेतील स्त्री आहे ती समाधान मानणारी, नव-याला सहयोग देणारी, तो कसलाही असला तरी तिची फारशी त्याच्याबद्दल तक्रार नाही पण त्याने आपल्याला सुख द्यावे, प्रेम द्यावे अशीच तिची मनोमन इच्छा आहे. असे हे स्त्री जीवन त्यांच्या 'शिळान अधिक आठ कथा' या कथासंग्रहातून दिसून येते.

'शिळान अधिक आठ कथा' या कथासंग्रहाची वैशिष्टये पुढीलप्रमाणे

दिसून येतात. निरनिराळया विषयाची केलेली मार्मिक मांडणी तसेच आटोपशिरपणा, भावस्पर्शी व्यक्तिमत्वाची निर्मिती, त्याचप्रमाणे निवेदनातील गतीशीलता, व-हाडी बोलीच्या खास ढंगदार शैलीतील कलात्मक आशय, इ. मानत्री मनाचे सुक्ष्मपदर अभिव्यक्त करण्यात उद्धव ज.शेळके काही प्रमाणात यशस्वी झालेले दिसतात.

उद्धव ज. शेळके यानी रेखाटलेल्या व्यक्तिचित्रणामध्ये व्यक्तीच्या बाहयांगावर भर देण्यापेक्षा त्या व्यक्तीच्या अंतर्मनाचे दर्शनही दिसून येते. लेखक मनाचे विविध पदर शोधतो. जीवनाकडे ज्या गांभीर्याने त्याच्या कथेतील व्यक्ती पाहतात. त्या दृष्टीकोणातूनच त्यांचे सोशिकपणे दुःख भोगणे हे दिसून येते. त्यामधून शेळके यांच्या लेखणीचे सामर्थ्य दिसते.

तिस-या प्रकरणात 'वानगी' या कथासंग्रहातील कथेची स्वरूप व वैशिष्टये सविस्तरपणे सांगितली आहेत. सर्वसामान्य माणसाच्या जीवनावर उद्धव ज. शेळके प्रकाश टाकतात. त्यावेळी त्यांचे दुःख, वेदना कष्ट कथेत मांडलेल्या असतात. जमीनदार सवर्ण यानी मजूर आणि अस्पृश्य लोकांचा केलेला छळ अगदी मोजक्या वर्णनात आणि परिणामकारकतेने मांडतात. ही मांडणी करीत असताना कुठेही आक्रस्ताळेपणा दिसत नाही. कलावंताची तटस्थ भूमिका घेऊनच ते जीवन चित्रित करतात. कुणाच्या तरी अन्यायाला बळी पडलेले विश्व या ठिकाणी आहे. यामध्ये प्रामुख्याने "दाद", "मास्तर", "गिधाड", "वडवानल" इ.कथा आहे. "दाद" मधील बसंती तिच्यावर देव्रावने बळजबरी केली म्हणून तिची आजी तिला घेऊन गावातील भिमा पाटलाकडे तक्रार करायला जाते. पण त्याची व्यथा बाजूलाच राहते. भिमा पाटलामधील पुरूष जागा व्हायला सुरूवात होते त्यामुळे बसंतीला देव्रावने कसे कसे केले हे सांगायला लावतो. तिच्या फाटक्या कपडयातून दिसणा-या शरीराच्या अवयवाकडेच त्याचे लक्ष जाते. कथा इथेच संपते. पण बसंतीची वेदना बाजूला राहते आणि भिमा पाटील आणि त्याचे मित्र तिच्या तशा अवस्थेतल्या शरीराचा

वेध घेणत गुंतलेले दिसतात. "गिधाड" आणि "वडवानल" या दोन कथाही स्त्रियावर होणा-या अन्यायाला वाचा फोडणा-या आहेत. "वडवानल" मधील ती अशीच घरच्या परिस्थितीला बळी पडून वेडी झालेली आहे. तिचा चुलता नांदत्या घरून आणून तिला गावी ठेवतो. यातच तिला दिवस जातात. व दुस-याकडून तिला दिवस गेले असे उठवले जाते म्हणून ती वेडी झालेली आहे. "रांडमुंड" ही कथा विधवा स्त्रीचे जीवन आणि व्यथा मांडणारी आहे. "ताठा" मधील आजी आपले म्हातारपण कसेतरी जगत आहे.

उद्धव ज. शेळक्यांच्या कथेतील प्रत्येक पात्र हे खेडयातील पात्र आहे. खेडयातील दुष्काळ, दारिद्रय, याला बळी पडलेल्या अनेक व्यक्ती येथे भेटतात "साधुबुवा" "भडका" आबा, "जाणीव", "लंगडा म्हादू" या कथेत आयुष्यातला एकाकीपणा लपवत जपत जीवन जगणा-या माणसाचे चित्रण केले आहे. लंगडा म्हादू ही कथा एका एकाकी पुरूषाची कहाणी आहे. तो विधूर आहे एक मुलगी होती त्याचे दुःख त्याने मांडले आहे. तर "डाक्तर" आणि "धंदा" या सारख्या कथेतून व्यवसायावर प्रेम करणारी माणसे रंगविली आहेत. ग्रामीण परिसर दरिद्री भांडवलाची आबाळ आणि तरीही चिकाटीने धंदा करण्याची वृत्ती दिसून येते. "वानगी" या कथासंग्रहातील जवळ जवळ सर्वच कथा ग्रामीण आहेत. फक्त "दबाव" ही एकच कथा अपवाद आहे. त्या कथेत संस्थेचे राजकारण आहे. राजकारण कसे असते याचे चित्रण या कथेत पहावयास मिळते.

"वानगी" या कथासंग्रहातील सर्वच कथेतून विदर्भातील खालच्या थरातील लोकांचे जीवन चित्रित झालेले असल्याने खरा विदर्भ नजरेत येतो. वरवरून सुखवस्तु वाटणारा हा परिसर अंतरंगातून किती पिचलेला आहे हे वानगी या कथासंग्रहावरून लक्षात येते.

चौथ्या प्रकरणात "कडूनिंबाची सावली" या व्यक्तिचित्रणात्मक कथासंग्रहाचा अभ्यास केला आहे. प्रामुख्याने यात स्वरूप आणि कथेची वैशिष्टये सांगितले आहेत.

व्यक्तिंची स्वभाव वैशिष्टये त्यांच्या सामाजिक स्तर, जीवन दृष्टी अनुषंगाने व्यक्तिचित्रांच्या सभोवतालचा भौगोलिक परिसर, व्यक्ती आणि निवेदक यांच्यामधील संबंध यांची मांडणी केलेली आहे.

"कडूनिंबाची सावली" या कथासंग्रहातील व्यक्ती वेगवेगळया स्तरातील आहेत. लेखकाच्या लहानपणापासून त्यांच्या उमेदीच्या काळापर्यंत ज्या अनेक व्यक्ती भेटल्या त्यापैकी त्यांच्या व्यक्तिमत्वावर ज्या प्रभाव टाकून गेल्या त्यांची व्यक्तिचित्रे त्यानी मित्र, समन्वयी वृत्तपत्र संपादक, मालक, समव्यवसायी अनेक व्यक्ती येतात. "बाई" आणि "चवदार भाबी" या दोन व्यक्तिचित्रात स्त्रियांचे चित्रण आले आहे. प्रभावी व्यक्तिचित्र रेखाटण्यासाठी लेखकाकडे सुक्ष्म निरीक्षण शक्ती आणि संवेदनशीलता असावी लागते. कारण एखादी व्यक्ती साकार करताना तिचे केवळ बाहयवर्णन येऊन चालत नाही. त्याचबरोबर त्या व्यक्तीचे अंतरंग सामाजिक स्तर इतर गोष्टींचाही समावेश करावा लागतो. शेळक्यांच्या "कडूनिंबाची सावली" मधून साकार होणा-या व्यक्तींची बाहयवर्णने त्यांच्या व्यक्तीमत्वावर अधिक प्रकाश टाकतात आणि ती व्यक्तिचित्रे प्रभावी होतात.

व्यक्तिचित्रणातून साकार होणारा सामाजिक स्तर व्यक्तीला स्वतंत्र अर्थ आणतोच असे नाही. त्याचे व्यक्तिमत्व साकार होते ते समाजामध्येच समाजाचा एक घटक म्हणून व्यक्तीकडे पाहिले जाते. समाजाच्या संस्कृतीचा आर्थिक स्तराचा व्यक्तीवर प्रभाव पडत असला तरी समाज अनेक व्यक्तीचा बनलेला असतो प्रत्येक व्यक्तीमध्ये सामूहिक मन असते. स्वतःला कितीही स्वतंत्रपणे वागण्याची इच्छा आली तरी व्यक्तीमधील सामूहिक मन तसे वागू देत नाही. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीवर सामाजिकतेचा प्रभाव असतो यामधूनच त्याचा सामाजिक स्तर निश्चित होत जातो.

पाचव्या प्रकरणामध्ये मराठी ग्रामीण कथेत उद्धव ज. शेळके यांचे मराठी

साहित्यातील योगदान स्पष्ट केले आहे. उद्धव ज. शेळके यांच्या 'शिळान अधिक आठ कथा' या कथासंग्रहातून ग्रामीण जीवन साकार केले आहे. तर 'वानगी' हा शेळक्यांचा अस्सल ग्रामीण कथासंग्रह आहे. या संग्रहात त्यानी वैदर्भीय जीवन चित्रित केले आहे. वैदर्भीय जीवनातील रूढी, परंपरा, दारिद्रय, अज्ञान आणि कौटुंबिक नात्यातील ताणतणाव त्यानी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शेळके यांच्या कथा केवळ वर्णनात्मक नसुन त्या विश्लेषणात्मक वाटतात.

उद्धव ज. शेळके यांनी वैदर्भीय बोलीला अधिक गहिरे बनविले आहे. आणि नव्याने त्यांनी भाषेचा वापर केला आहे त्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा दारिद्रयाने खंगलेल्या असल्यातरी संयम राखताना दिसतात. शेळक्यांच्या पात्रापुढे दैनंदिन जीवन जगणे आणि जगविणे हाच मूलभूत प्रश्न दिसतो. त्यांच्या पोटाची भूक महत्वाची असते. यासाठीच त्यांची पात्रे जगताना आणि झगडताना दिसतात.

अशाप्रकारे वैदर्भीय ग्रामीण जीवनाचा(च) वास्तवाश्रयी अविष्कार घडविणारे उद्धव ज. शेळके हे मराठीतले महत्वाचे कथाकार ठरतात.

-o-o-o-o-